


# शालेय शिक्षण विभाग

## महाराष्ट्र शासन

## अर्थसंकल्प : २०१७-१८



**समर्थन**




**समर्थन**

**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**

कार्यालयीन पत्ता: समर्थन, ११५, धुरी कॉमर्स प्लाझा,
वसई रोड रेल्वे स्थानकासमोर, वसई (पू),
पालघर -४०१ २०८ ☏ ०२५०-२३९०१०३/४
Email: samarthanmumbai97@gmail.com,
Website: www.samarthanadocacy.org

## समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **श्री. सुशील शुक्ल**

संपादन :

**मुक्ता भारती**

संकलन:

**रुपेश कीर** -९८९२९३९६१७

मांडणी व अक्षरजुळणी :

**प्रतिक्षा कोयंडे**

**नोंदणी क्रमांक:**

पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

**प्रकाशक (पत्रव्यवहार):**

समर्थन – ११५- धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड
रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), जि. पालघर -४०१ २०८
दूरध्वनी: ०२५०-२३९०१०३/४
Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org

# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

- ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# पुस्तिका वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- ‘समर्थन’ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती पुस्तिकेचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. ही पुस्तिका माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २०१०-११ पासून २०१७-१८ पर्यंत अर्थसंकल्पातील प्रत्यक्ष खर्च आणि तरतूद समाविष्ट केली आहे.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी समर्थन स्वीकारीत आहे.

- विवेक पंडित
संस्थापक, समर्थन
९८२३१४७००३
pvivek2308@gmail.com

## शाळाबाह्य मुलांचा प्रश्न शासनाला मान्य करायचा नाही का?

- शाळाबाह्य मुलांचे ४ जुलैचे पहिले सर्वेक्षण फसल्यावर १५ ते ३१ जानेवारी दरम्यान दुसरे सर्वेक्षण करण्यात आले. पहिल्या सर्वेक्षणात ५५ हजार तर दुसऱ्या सर्वेक्षणात केवळ १० हजार मुले शासन शोधू शकले आहे. व या सर्वेक्षणाच्या अपयशाचे कारण स्वयंसेवी संस्थांना धरून शासन आपली जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करीत आहे.
- शासन ४ जुलै २०१५च्या सर्वेक्षणानंतर असे म्हणत होते की, शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण वर्षभर चालू राहणार १५ ते २१ जानेवारीच्या दुसऱ्या सर्वेक्षणानंतरही शासन तेच सांगत आहे. प्रश्न हा आहे की केवळ सर्वेक्षण आणखी किती वर्षे चालणार आहे? महाराष्ट्राची खरी शाळाबाह्य संख्या कळायला किती काळ वाट बघायला लागणार आहे. हे शासनाने जाहीर करावे. फेर सर्वेक्षण फसल्यामुळे या मुलांचे हे संपूर्ण वर्ष वाया गेले आहे. याची जबाबदारी कोण घेणार?
- शिक्षण हक्क कायदा लागू होऊन सहा वर्ष झाली तरी अजून शाळाबाह्य मुले किती आहेत हे जर नक्की होत नसेल तर ही मुले शाळेत येणार कधी, शिकणार कधी? याचे उत्तर मिळायला हवे. शिक्षण मंत्री दोन्ही सर्वेक्षणाबाबत बोलताना ही पूर्ण सर्वेक्षण नाहीत असे सांगून शासकीय यंत्रणेचा बचाव करतात परंतु शिक्षण यंत्रणेने ही दोन्ही सर्वेक्षण परिपूर्ण झालेली आहेत असेच कागदावर दाखविले आहे. अशा प्रकारे क्रूरपणे राज्यातील शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर हे शासन कोणती कारवाई करणार आहे. शिक्षण हक्काचा कायदा आजच्या शालेय शिक्षण मंत्र्यांनी समजून घेण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाचा हक्क सामाजिक बाब नसून प्रत्येक बालकाला तो हक्क आहे. तो त्याला जन्मत:च मिळाला आहे. आणि तो देणे हे शासनाचे घटनात्मक कर्तव्य आहे. शाळाबाह्य मुले किती हा काय विचार करण्याचा विषय आहे काय? एक बालक जरी शाळेच्या बाहेर असेल तर त्याला शिक्षण देण्याचे कार्य शासनाचे आहे.
- वारंवार शाळाबाह्य मुलांचे सर्व्हेक्षण करीत बसलो आहोत. या बालकांना शिक्षणाची योजना कोणती ते सांगा? शाळा बाह्य मुले दाखवा आणि हजार रुपये मिळवा अशा योजना आखता. मंत्री महोदय, प्राथमिक शिक्षण परिषदच कबूल करते. ७४ हजार ९७१ मुले आजही शाळेच्या बाहेर आहेत. तर जानेवारी २०१६ ते मार्च २०१६ मध्ये ४७ हजार १७६ मुले आढळून आली आहेत. शहामृगासारखे वादळ आल्यावर तोंड का लपवता? मंत्री महोदय, ही मुले शाळेत येत नाहीत म्हणून त्यांच्यापर्यंत शाळा नेण्याची योजना तयार करा. आधीच उशीर झाला आहे. या मुलांचा शिक्षणाचा हक्क हिरावून घेण्याचा अधिकार आपणास दिलेला नाही. खुद्द मुंबईत ७ हजाराहून अधिक मुलं शाळाबाह्य असल्याची आपलीच आकडेवारी सांगते. तर मान. शिक्षण सचिव हा आकडा ४ लाखांपेक्षा जास्त असू शकतो असेही म्हणतात.

# शालेय शिक्षणाची ठळक वैशिष्ट्ये

## राज्याची शैक्षणिक स्थिती :

☞ राज्यात माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्यांची संख्या केवळ ४ कोटी ४७ लाख (३९.८% )आहे. म्हणजेच ६ कोटी ७७ लाख (६०.२%) व्यक्तीचे माध्यमिक शिक्षणही झालेले नाही.

☞ वर्ष २०१६-१७ मध्ये प्राथमिक शाळांची संख्या मागील वर्षाच्या तुलनेत ६ हजार ७५१ने वाढून १ लाख ४ हजार ९७० झाली. मागील वर्षी ती ९८ हजार २१९ होती. मात्र प्राथमिक शाळेतील पटसंख्या मागील वर्षी १ कोटी ६० लाख ४४ हजार होती त्यात २०१६-१७ मध्ये ९८ हजारांची घट झाली आहे.

☞ वर्ष २०१५-१६ मध्ये ४ हजार ९७१ शाळाबाह्य मुले आढळून आलीत त्यापैकी २४ हजार २८९ मुले आजही शाळाबाह्यच आहेत. म्हणजेच शासन सर्वच शाळाबाह्य मुलांना शाळेत आणू शकलेली नाहीत.

☞ राज्यातील गरीब, आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच अवर्षणप्रवण क्षेत्रातील विद्यार्थी व आदिवासी समाजातील ३५ लाख ९७ हजार विद्यार्थ्यांसाठी वर्ष २०१५-१६ मध्ये रु. ४४ कोटी ३० लाख खर्च करण्यात आले होते. मात्र २०१६-१७ मध्ये विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होऊन ती ४ लाख ९१ हजार झाली म्हणजेच ३१ लाख ६ हजार विद्यार्थी - लाभार्थी घटलेले असून त्यांच्यावर होणाऱ्या खर्चातही मोठ्या प्रमाणावर घट झालेली आहे. मागील वर्षी यासाठी ४४ कोटी ३० लाख खर्च करण्यात आले होते त्यामध्ये आता ३१ कोटी ३२ लाख रुपयांची घट झालेली दिसते.

☞ मुलींच्या शिक्षणासाठी हे शासन किती संवेदनशील आहे हे वेळोवेळी सांगत असते. मात्र मुलींना मिळणारा उपस्थिती भत्ता, अहिल्याबाई होळकर योजना, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना तसेच ११वी व १२वीत शिकणाऱ्या विद्यार्थिनींना मोफत शिक्षण या योजनेसाठी २०१५-१६ मध्ये ९४ कोटी ५२ लाख रुपये खर्च झाला होता तर २३ लाख विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ घेतला होता. त्यात २०१६-१७ मध्ये केवळ १६ लाख ९१ हजार विद्यार्थिनींना लाभ मिळाला म्हणजे ६ लाख ५० हजार लाभार्थी विद्यार्थिनीची घट झाली तर खर्चही रु.१२ कोटी ४३ लाखांनी घटला.

☞ राज्याने प्राथमिक शिक्षणास महत्त्व दिल्यामुळे साक्षरता दरात सातत्याने सुधारणा होत आहे. जनगणना २०११ नुसार अखिल भारतीय स्तरावरील ७३ टक्के साक्षरता दराच्या तुलनेत राज्याचा साक्षरता दर ८२.३ टक्के आहे.

☞ राज्यातील साक्षरतेचे प्रमाण ८२.३% आहे. मात्र त्याचवेळी अनुसूचित जातीमध्ये साक्षरतेचे प्रमाण ७९.७% व अनुसूचित जमातीमध्ये साक्षरतेचे प्रमाण त्याही पेक्षा कमी ६५.७% आहे.

*स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१६-१७*

**प्राथमिक उच्च प्राथमिक शाळा, शिक्षक आणि विद्यार्थी :**

☞ वर्ष २०१५-१६ मध्ये प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांची (इयत्ता १ली ते ८वी) संख्या ९८ हजार २१३ इतकी होती. त्यामध्ये ३६ जिल्ह्यांचा समावेश असून ४३ हजार ६६१ गावांचा समावेश आहे.

☞ ७९ हजार ४७६ शाळा या वर्ष २००१ पूर्वीच्या आहेत तर १८ हजार ७३७ शाळा या वर्ष २००१ नंतर निर्माण झालेल्या आहेत.

☞ वर्ष २०११च्या जनगणनेनुसार राज्याची एकूण लोकसंख्या ११कोटी २३ लाख ७३ हजार असून त्यापैकी ७ कोटी १२ लाख ४४ हजार (६३.४७) लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते.

☞ राज्यामध्ये १००० पुरुषांमागे ९२५ महिला आहेत. याचाच अर्थ पुरुषांच्या तुलनेत ४१,११,७७९ महिला कमी आहेत.

☞ राज्याचे एकूण साक्षरता प्रमाण ८२.९टक्के असून पुरुष साक्षरता प्रमाण ८९.८टक्के तर स्त्री साक्षरता प्रमाण ७५.५ टक्के आहे.

☞ वर्ष २०१५-१६ मध्ये वर्ष २०१४-१५च्या तुलनेत १,१२९ शाळांमध्ये वाढ झाली आहे.

☞ ९८ हजार २१३ शाळांपैकी ६७ हजार २९४ शाळा या शासनाच्या आहेत तर ३० हजार ३८३ शाळा या खाजगी स्वरुपाच्या आहेत. तर मदरसा व अमान्यता प्राप्त अशा ५३६ शाळा आहेत.

☞ ७७ हजार ९७१ शाळा या ग्रामीण भागात असून त्यापैकी १६ हजार २०२ शाळा या खाजगी स्वरुपाच्या आहेत.

☞ ९८ हजार २१३ शाळांमधून १कोटी ६० लाख ४३ हजार ७७५ विद्यार्थी शिक्षण येत आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत या वर्षी १ लाख २८ हजार ६५९ विद्यार्थ्यांची गळती झाली आहे.

☞ ७५ हजार ५१३ विद्यार्थी हे मदरसा व अमान्यताप्राप्त शाळांमधून शिक्षण घेत आहेत.

☞ ९८ हजार २१३ शाळांमधून १ कोटी ६० लाख ४३ हजार ७७५ विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी असणाऱ्या शिक्षकांची संख्या ६ लाख ६६ हजार ६२५ इतकी आहे. त्यापैकी ३९ हजार ३८९ (५.९०टक्के) शिक्षक हे कंत्राटी तत्त्वावर शिकवत आहेत.

☞ ५७६ मदरसा व अमान्यताप्राप्त शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांची संख्या ३ हजार २०३ इतकी आहे. मागील वर्षाच्या तुलनेत १५ ने वाढली आहे.

**राज्यातील प्राथमिक शिक्षणाचे वास्तव :**

☞ सर्वांना शिक्षण हक्क कायदा, २००९ अंमलात आला त्याला ६ वर्षे उलटून गेली तरी राज्यात सुरू असलेल्या ९८ हजार २१३ प्राथमिक शाळांपैकी ३ हजार ४४ शाळा या एक शिक्षकी आहेत.

☞ राज्यातील ३ हजार १४२ शाळा या प्रत्येकी एक वर्ग खोलीत भरतात.

☞ राज्यातील २ हजार ४५५ शाळा रस्त्यांनी जोडल्या गेलेल्या नाहीत.

☞ आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरस्काराची अपेक्षा शासन करते मात्र आजही १२ हजार ५७२ शाळांमध्ये मुलांना खेळण्यासाठी खेळाचे मैदान उपलब्ध नाही.

☞ १८ हजार ३६५ शाळांना कुंपण भिंत बांधलेली नाही.

☞ महिला सबलीकरण, महिला सुरक्षिततेची भाषणे करणाऱ्या शासनाच्या राज्यात ५८९ शाळांमध्ये मुलींना स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध नाही.

☞ ७८५ शाळांमध्ये मुलांना स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध नाही.

☞ २९८ शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सोय केलेली नाही.

☞ २ हजार ७४९ शाळांमध्ये आजही मध्यान्ह भोजन दिले जात नाही.

☞ ११ हजार ५८९ शाळांमध्ये स्वयंपाक करण्यासाठी (Kitchen shed) वेगळी खोली बांधलेली नाही.

☞ मेक इन महाराष्ट्राची प्रचार आणि प्रसार करणाऱ्या राज्यात आजही १३ हजार ८४८ शाळांमध्ये वीज जोडणी झालेली नाही. या शाळा पूर्णपणे अंधारात आहेत.

☞ इ-गव्हर्नन्स, डिजिटल महाराष्ट्राचा उद्घोष करणाऱ्या शासनाच्या राज्यात ४२ हजार ३२९ शाळांमधून आजही संगणक उपलब्ध नाहीत.

☞ दुर्बल अपंग यांचे पालकत्त्व संविधानाने शासनाकडे दिलेले आहे, मात्र आजही ६ हजार ८७४ शाळांमध्ये अपंग विद्यार्थ्यांसाठी उतरंड बांधलेली नाही.

☞ २ हजार ६५१ शाळांमध्ये शिक्षण हक्क कायदा, २००९ नुसार शाळा व्यवस्थापन समिती स्थापन झालेली नाही.

☞ राज्यातील विविध शाळांमध्ये ५ लाख १६ हजार २१३ वर्गखोल्या आहेत, त्यापैकी २९ हजार ३०१ वर्गखोल्या धोकादायक स्थितीत आहेत.

☞ ६ लाख ६६ हजार ३३८ शिक्षकांपैकी १ हजार ८६८ शिक्षकांचे शिक्षण इयत्ता १०वी पर्यंतही झालेले नाही. ८२ हजार ४२७ शिक्षकांचे शिक्षण हे इयत्ता १०वी पर्यंत झाले आहे. १ लाख ५६ हजार ३४६ शिक्षक हे उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले होते. ३ लाख ३ हजार ६५५ शिक्षक हे पदवीधर होते.. तर १ लाख १९ हजार ८९७ शिक्षक पदव्युत्तर होते. तर १ हजार ९७१ शिक्षक हे एम. फिल./ पी. एच. डी. झालेले १७० शिक्षक हे पोस्ट डॉक्टरेट केलेले होते.

☞ पोस्ट डॉक्टरेट झालेले १४ शिक्षक तर एम. फिल / पी. एच. डी. झालेले १३५ शिक्षक इयत्ता १ ली ते ५ वीच्या वर्गात शिकवत होते.

*-स्त्रोत: www.udise.in (2015-16)*


# शालेय शिक्षण विभाग

सामाजिक आणि आर्थिक विकासाची प्रगती सुकर करण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व सर्वमान्य आहे. शिक्षणामुळे वैयक्तिक आणि सामूहिक नावलौकिक मिळविण्याच्या संधी उपलब्ध होतात. लोकांना कौशल्य व ज्ञान मिळवून देऊन त्यांना उत्पादक रोजगारीची संधी मिळवून देणे आणि पर्यायाने राज्याच्या आर्थिक विकासाला गतिमान करण्यासाठी तसेच युवकांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शिक्षण हे एक अत्यंत निर्णायक साधन आहे. शिक्षणाद्वारे व्यक्तीचे केवळ लेखन व वाचन संस्था विकसित करणे एवढेच अपेक्षित नसून व्यक्तीमधील सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यांचा विकास करून, परिपूर्ण व्यक्तिमत्त्व घडविणे हे शिक्षणाचे अंतिम ध्येय आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्याला यापुढे भौतिक पायाभूत सुविधांसोबत (Physical Infrastructure) सामाजिक पायाभूत सुविधा (Social Infrastructure) निर्माण करण्यावर भर द्यावा लागणार आहे. महाराष्ट्रात भौतिक पायाभूत सुविधांसाठी ज्या गतीने निधी उपलब्ध होतो. तशीच गती शिक्षणाचा समावेश असणाऱ्या सामाजिक पायाभूत सुविधांवर करणे क्रमपात्र ठरते.

## मागील ६ वर्षांत शालेय शिक्षण विभागाच्या एकूण अर्थसंकल्पात सरासरी खर्च केवळ ३० हजार ६६३ कोटी रुपये

*आलेख क्र. १.* *(रु. कोटीत)*

**शालेय शिक्षण विभागाचा अर्थसंकल्प**




| | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | २४१०८ | २७७८८ | २९६३६ | ३३९५३ | ३५४६२ | ४०१४६ | ४२६२१ | ४८८४४ |
| सुधारित अंदाज | २४६४६ | २६७२८ | ३०४५३ | ३३०९६ | ३६४२९ | ४००६२ | ४१५६४ | |
| प्रत्यक्ष खर्च | २३६९१ | २६०७२ | २९०९२ | ३२५९३ | ३४७७५ | ३७४५६ | | |

*(स्त्रोत :वित्तविषयक विवरणपत्र व अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका, निव्वळ रकमा)*
*टीप: वर्ष २०१६-१७चे सुधारित अंदाज व वर्ष २०१७-१८ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*


- **वर्ष २०१०-११ ते वर्ष २०१५-१६ या मागील ६ वर्षांत शालेय शिक्षण विभागाचा सरासरी खर्च हा रु.३० हजार ६६३ कोटी इतका झाला.**
- **मागील ६ वर्षांत सुधारित अंदाज हे मोठ्या स्वरूपात मांडले गेले मात्र विभागाला त्याप्रमाणात निधी उपलब्ध झाल्याचे दिसून येत नाही.**
- **त्यामुळे वर्ष २०१७-१८ चे अर्थसंकल्पीय अंदाज व वर्ष २०१६-१७ मधील सुधारित अंदाज हे मोठ्या स्वरूपात मांडले जाऊनही विभागाला मात्र त्यामानाने कमीच निधीची उपलब्धता होईल.**

# गेल्या ६ वर्षात प्राथमिक शिक्षणावर झालेला खर्च ५१ टक्के

## शासनाचे आश्वासन मात्र ७५ टक्क्यांचे

लोकशाही आघाडी शासनाने सन २००० मध्ये जाहीर केलेल्या किमान समान कार्यक्रमात राज्य स्थूल उत्पन्नाच्या किमान ७ टक्के रक्कम शिक्षणासाठी राखून ठेवण्यात येईल व त्यापैकी ७५ टक्के रक्कम प्राथमिक शिक्षणासाठी प्राथम्याने राखून ठेवण्यात येईल असे म्हटले होते. मात्र आघाडी शासनाने आपली उक्ती सार्थ केली नाही त्यांच्या पायावर पाऊल ठेवीत २०१४ मध्ये आलेल्या युती शासनानेही प्राथमिक शिक्षणासाठी ७५ टक्के निधी उपलब्ध केलेला नाही.

*आलेख क्र. २*




*(स्त्रोत: खर्चाचा प्रधानशीर्ष नि विभागवार सारांश व लोकलेखा, अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका, निव्वळ रकमा)*

*(टीप: वर्ष २०१६-१७ चे सुधारित अंदाज व वर्ष २०१७-१८चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- वर्ष २०१६-१७ मध्ये शिक्षणावरील एकूण खर्चापैकी सर्वाधिक ५४.०८ टक्के रक्कम प्राथमिक शिक्षणासाठी सुधारित अंदाज करण्यात आले आहेत. वर्ष २०१७-१८ मध्ये ५३.४२ टक्के निधी अंदाजित केला आहे. म्हणजे तो २०१६-१७ पेक्षा कमी आहे. मात्र जेव्हा वर्ष २०१६-१७ मध्ये निधी प्राथमिक शिक्षणासाठी उपलब्ध केला जाईल तेव्हा त्यात घट झालेली असेल.

- वर्ष २०१०-११ ते वर्ष २०१५-१६ या ६ वर्षात शिक्षणावर होणाऱ्या एकूण खर्चात प्राथमिक शिक्षणावर होणारा सरासरी खर्च केवळ ५१.७७ टक्के राहिला आहे.


- गेल्या ६ वर्षात प्राथमिक शिक्षणासाठी सर्वात जास्त निधी वर्ष २०११-१२ मध्ये ५३.१० टक्के उपलब्ध झाला होता. तर २०१६-१७ मध्ये ५४.०८ टक्के निधी सुधारित केला आहे.

- **वर्ष २०१५-१६ मध्ये नव्याने आलेल्या शासनानेही मागील ३ वर्षात प्राथमिक शिक्षणाप्रती आस्था दाखविलेली नाही. प्राथमिक शिक्षणासाठी ७५ टक्के निधी राखून ठेवणे अपेक्षित होते. मात्र प्राथमिक शिक्षणासाठीचा खर्च प्रत्यक्षात एकाही वर्षी ५५ टक्केच्या वर गेला नाही. त्यामुळे यापुढेही प्रत्यक्षात कमी निधी उपलब्ध होणार हे गृहित धरले पाहिजे.**

# राज्य अर्थसंकल्पापैकी सर्वसाधारण शिक्षणावर होणारा खर्च १८ टक्के

*आलेख क्र. ३*

**राज्य अर्थसंकल्पापैकी सर्वसाधारण शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण**




| | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टक्केवारी | १९.५२ | १८.९४ | १७.५० | १९.२१ | १७.२७ | १५.८३ | १४.०१ | १५.५३ |

*(स्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प, व खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा, निव्वळ रकमा)*

*(टीप: वर्ष २०१६-१७ चे सुधारित अंदाज व वर्ष २०१७-१८ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*


- राज्य अर्थसंकल्पापैकी सर्वसाधारण शिक्षणावर मागील ६ वर्षांत सरासरी १८.०४ टक्के निधी उपलब्ध.
- सर्वसाधारण शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचा आलेख पाहता असे दिसते की, या शासनाचा वर्ष २०१५-१६ मध्ये ते सर्वात कमी १५.४२ टक्के इतके होते. तर वर्ष २०१०-११मध्ये ते सर्वात जास्त १९.५२ टक्के इतके होते.
- वर्ष २०१०-११ ते २०१५-१६ या ६ वर्षांच्या कालावधीत या शासनाच्या काळात २०१५-१६ मध्ये सर्वसाधारण शिक्षणावर होणारा खर्च सर्वात कमी झाला असून तो १५.८३ टक्के आहे.
- **मागील ६ वर्षात सर्वसाधारण शिक्षणावर होणारा खर्च हा राज्य अर्थसंकल्पाशी तुलना करता कधीच २० टक्क्यांपेक्षा जास्त झालेला नाही.**

***अर्थसंकल्पात सांगितल्याप्रमाणे शालेय शिक्षणावर ३० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च करण्यात येत असला तरी गुणात्मक फरक दिसून येत नाही तसेच विभागाने सर्वसाधारण शिक्षणावर राज्याच्या एकूण महसुली खर्चाच्या १/६ निधी खर्च करणे गरजेचे आहे. मात्र शासनाने कधीच तेवढा निधी खर्च केलेला नाही.***

*-स्रोत: अर्थसंकल्प, २०१७-१८ आणि कार्यक्रम अंदाजपत्रक, २०१७-१८ शालेय शिक्षण (प्राथमिक शिक्षण)*

# सर्वसाधारण शिक्षण व तंत्रशिक्षणावरील खर्च राज्य स्थूल उत्पन्नाच्या केवळ २.४० टक्के

*आलेख क्र.४*




*(स्त्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प, व खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा, निव्वळ रकमा)*

*(टीप: शिक्षणावरील एकूण खर्चात २२०२, सर्वसाधारण शिक्षण व २२०३, तंत्र शिक्षण यांचा समावेश आहे)*

*(टीप: वर्ष २०१६-१७ चे सुधारित अंदाज व वर्ष २०१७-१८ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **शिक्षणावरील खर्च हा २२०२, सर्वसाधारण शिक्षण व २२०३, तंत्र शिक्षण या प्रधान शीर्षांच्या अंतर्गत होतो. या दोन्ही शीर्षांवर होणाऱ्या खर्चाचे राज्य स्थूल उत्पन्नाशी असलेले प्रमाण वर्ष २०१०-११ते २०१५-१६ पर्यंत सरासरी २.३८ टक्के इतके होते.**

- **वर्ष २०१६-१७ मध्ये सुधारित सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षण यावरील खर्चाचे प्रमाण केवळ २.८ टक्के इतकेच अर्थसंकल्पीत करण्यात आले आहे. म्हणजे सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षणावर होणारा खर्च २०१०-११ पेक्षाही कमी अर्थसंकल्पीत झाला आहे. आतापर्यंतचा हा सर्वात नीचांक असून त्यापेक्षाही कमी निधी उपलब्ध होईल.**

- **वर्ष २०१४-१५ मध्ये सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षण यावर खर्चाचे प्रमाण २.१९ टक्के एवढे होते, वर्ष २०१५-१६ मध्ये ते २.२० टक्क्यांवर आले.**

- **वर्ष २०१२-१३ मध्ये सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षणावर राज्य स्थूल उत्पन्नाच्या तुलनेत २.५२ टक्के खर्च करण्यात आले होते. हे प्रमाण गेल्या ६ वर्षात सर्वात अधिक राहिले आहे.**

# शालेय शिक्षण विभागातच १ हजार १२७ पदे रिक्त

## रिक्त पदांचे प्रमाण पोहचले ५१ टक्क्यांवर

तक्ता क्र.१

| गट | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| अ | ४१४ | ३०० | ११४ |
| ब | १७७५ | ७६२ | १०१३ |
| **एकूण** | **२१८९** | **१०६२** | **११२७** |

*स्त्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती, १ मार्च २०१७*

☞ **शालेय शिक्षण विभागांतर्गत २ हजार १८९ पदे मंजूर असून त्यापैकी १ हजार ६२ पदे कार्यरत आहेत तर १ हजार १२७ (५१.४८%) पदे रिक्त आहेत.**

☞ **शालेय शिक्षण विभागात १ हजार १२७ पदांपैकी ११४ पदे ही 'अ' दर्जाची आहेत. तर १ हजार १३ पदे ही 'ब' दर्जाची आहेत.**

# शिक्षण संचालनालय पुणे रिक्त ३८ पदे रिक्त

## शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) कार्यालयातील रिक्त पदे

तक्ता क्र.२

| गट | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| **अ** | **८** | **६** | **२** |
| **ब** | **५** | **३** | **२** |
| **क** | **५८** | **३३** | **२५** |
| **ड** | **१८** | **९** | **९** |
| **एकूण** | **८९** | **५१** | **३८** |

*स्त्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती, ८ मार्च २०१७*

☞ **माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय पुणे येथे पदांची मंजुर संख्या ८९ असून त्यापैकी ५१ पदे कार्यरत आहेत तर ३८ पदे रिक्त आहेत.**

☞ **रिक्त पदांमध्ये गट 'अ' व गट 'ब' दर्जाची प्रत्येकी दोन-दोन पदे आहेत तर सर्वात जास्त रिक्त पदे ही 'क' दर्जाची आहेत.**

# इयत्ता १ली ते ८वी दरम्यान २ लाख ३४ हजार ४३ मुलांनी वेगवेगळ्या कारणांमुळे शाळा सोडल्या

### प्राथमिक शिक्षणात होणारी गळती थांबणार कधी ?

तक्ता क्र. ३

| इयत्ता | विद्यार्थी संख्या | गळती संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २०३९८९२ | ३९७७८ | १.९५ |
| २ | २०१७२८८ | २३६०२ | १.१७ |
| ३ | १९९२५८८ | १७३३५ | ०.८७ |
| ४ | १९८७६८७ | १९४७९ | ०.९८ |
| ५ | १९८९०४७ | ९९५ | १.२९ |
| ६ | २०११७२८ | १९९१६ | ०.९९ |
| ७ | २०४४३२६ | ६४६०० | ३.१६ |
| ८ | १९६१२१९ | २४१२३ | १.२३ |
| **१-५** | **१००२६५०२** | **१२६३३४** | **१.२६** |
| **६-८** | **६०१७२७३** | **१०७७०९** | **१.७९** |
| **एकूण** | **१६०४३७७५** | **२३४०४३** | **१.४५** |

☞ **वर्ष २०१५-१६ मध्ये इयत्ता १ली ते ८वी दरम्यान वेगवेगळ्या कारणांमुळे २ लाख ३४हजार ४३ मुलांनी शाळा सोडल्या म्हणजेच ही मुलं शाळाबाह्य झाली. शाळा गळतीचे हे प्रमाण १.४५ % होते.**

☞ **वर्ष २०१५-१६ मध्ये इयत्ता १ली ते ५वी दरम्यान १ कोटी २६ हजार ५०२ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्या दरम्यान १ लाख २६ हजार ३३४ (१.२६%)विद्यार्थ्यांनी शाळा सोडली.**

☞ **वर्ष २०१५-१६ मध्ये इयत्ता ६वी ते ८वी दरम्यान ६० लाख १७ हजार २७३ विद्यार्थी शिक्षण घेत होते त्यापैकी १ लाख ७ हजार ७०९ (१.७९%) विद्यार्थ्यांनी शाळा सोडली**

☞ **वर्ष २०१५-१६ मध्ये शाळागळतीचे सर्वात जास्त प्रमाण इयत्ता ७वी मध्ये असून २० लाख ४४ हजार ३२६ विद्यार्थ्यांपैकी ६४ हजार ६०० (३.१६%) विद्यार्थ्यांनी शाळा सोडली आहे.**

☞ **वर्ष २०१५-१६ मध्ये इयत्ता ३री तील शाळा गळतीचे प्रमाण सर्वात कमी राहिले असून १९ लाख ९२ हजार ५ ८८ विद्यार्थ्यांपैकी १७ हजार ३३५ (०.८७%) विद्यार्थ्यांनी शाळा सोडली होती.**

*-स्रोत: www.udise.in (2015-16)*

# शासनाला ७४ हजार ९७१ शाळाबाह्य मुले अखेर सापडली

## राज्यात आढळून आलेली जिल्हानिहाय शाळाबाह्य मुले/मुली

(कालावधी ४ जुलै २०१५ ते ३१ जानेवारी, २०१६)

तक्ता क्र.४-अ

| शाळाबाह्य मुले | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अक्र. | जिल्हा | मुले | मुली | एकूण | अक्र. | जिल्हा | मुले | मुली | एकूण | अक्र. | जिल्हा | मुले | मुली | एकूण |
| १ | अहमदनगर | ७१३ | ६४३ | १३५६ | १३ | जळगांव | १३७२ | १२५५ | २६२७ | २५ | **पालघर** | **२२६५** | **२७८३** | **५०४८** |
| २ | अकोला | ३३९ | ३०४ | ६४३ | १४ | जालना | १३२३ | ८९७ | २२२० | २६ | **पुणे** | **३०८४** | **२७५२** | **५८३६** |
| ३ | अमरावती | ४६१ | ३५३ | ८१४ | १५ | कोल्हापूर | ४१७ | १८२ | ५९९ | २७ | रायगड | ६३२ | ६८३ | १३१५ |
| ४ | औरंगाबाद | ११८४ | ६९८ | १८८२ | १६ | लातूर | ४४९ | २४७ | ६९६ | २८ | रत्नागिरी | २६४ | २१० | ४७४ |
| ५ | बीड | १३५७ | १०४९ | २४०६ | १७ | मुंबई | १०६९ | ६४६ | १७१५ | २९ | सांगली | ७०६ | २६३ | ९६९ |
| ६ | भंडारा | १८४ | ११६ | ३०० | १८ | **मुंबई उप.** | **६२६७** | **५३७८** | **११६४५** | ३० | सातारा | २६८ | २६४ | ५३२ |
| ७ | बुलडाणा | ३९७ | ३२२ | ७१९ | १९ | नागपूर | ९८४ | ७५३ | १७३७ | ३१ | सिंधुदुर्ग | २५६ | ११० | ३६६ |
| ८ | चंद्रपूर | ३७६ | २३४ | ६१० | २० | नांदेड | १०१२ | ८०० | १८१२ | ३२ | सोलापूर | ११९८ | ७५१ | १९४९ |
| ९ | धुळे | २०४९ | १४९३ | ३५४२ | २१ | नंदुरबार | १७५४ | २११२ | ३८६६ | ३३ | ठाणे | **४४३७** | **३७५६** | **८१९३** |
| १० | गडचिरोली | ४१६ | ४५३ | ८६९ | २२ | **नाशिक** | **३१९०** | **२३४६** | **५५३६** | ३४ | वर्धा | १०५ | ९० | १९५ |
| ११ | गोंदिया | २०६ | १५३ | ३५९ | २३ | उस्मानाबाद | २७२ | २६१ | ५३३ | ३५ | वाशिम | १५९ | ८६ | २४५ |
| १२ | हिंगोली | ८८७ | ८८९ | १७७६ | २४ | परभणी | ६७७ | ४५७ | ११३४ | ३६ | यवतमाळ | २५१ | २०२ | ४५३ |
| | | | | | | | | | | | **एकूण** | ४०९८० | ३३९९१ | ७४९७१ |

*-स्त्रोत: माहितीच्या अधिकाराखाली महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून प्राप्त माहिती*

☞ **४ जुलै, २०१५ ते ३१ जानेवारी, २०१६ च्या दरम्यान ७४ हजार ९७१ शाळाबाह्य मुले आढळून आली असून त्यापैकी ३३ हजार ९९१(४५.३३%) मुलींचा समावेश आहे.**

☞ **मुंबई उपनगरात सर्वात जास्त शाळाबाह्य मुले आढळून आली असून त्यांची संख्या ११ हजार ६४५ (१५.५३%) आहे. त्यानंतर ठाणे जिल्हा दुसऱ्या क्रमांकावर असून शाळाबाह्य मुलांची संख्या ८ हजार १९३ (१०.९२%) आहे. तिसऱ्या क्रमांकावर पुणे जिल्हा असून शाळाबाह्य मुलांची संख्या ५ हजार ८३६ (७.७८%) आहे, चौथ्या क्रमांकावर नाशिक जिल्हा असून शाळाबाह्य मुलांची संख्या ५ हजार ५३६ (७.३८%) आहे तर पाचवा क्रमांक पालघर जिल्ह्याचा असून पालघर जिल्ह्यात ५ हजार ४८ (६.७३%) शाळाबाह्य मुले आढळून आली आहेत.**

☞ **मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, नाशिक व पालघर या ५ जिल्ह्यांमध्ये ३६ हजार २९८ शाळाबाह्य मुले आढळून आली असून एकूण आढळलेल्या शाळाबाह्य मुलांच्या तुलनेत ही संख्या ४८.३६% आहे.**

☞ **शाळाबाह्य मुलींची संख्या पाहता मुंबई उपनगर मध्ये सर्वात जास्त ५ हजार ३७८, दुसऱ्या क्रमांकावर ठाणे जिल्हा असून ३ हजार ७५६, पालघर मध्ये २ हजार ७८३ मुली आढळल्या असून एकूण आकडेवारीत तिसऱ्या क्रमांकावर आहे. तर चौथ्या क्रमांकावर पुणे जिल्हा असून पुणे जिल्ह्यातील शाळाबाह्य मुलींची संख्या २ हजार ७५२ आहे. तर पाचव्या क्रमांकावर नाशिक जिल्हा असून नाशिक जिल्ह्यात २ हजार ३४६ तर नंदूरबार जिल्हा ७व्या क्रमांकावर असून २ हजार ११२ शाळाबाह्य मुली आढळून आल्या आहेत.**

# राज्यात नव्याने आढळून आली ४७ हजार १४७ शाळाबाह्य मुले

## (कालावधी जानेवारी २०१६ ते जानेवारी २०१७)

तक्ता क्र. ४-ब

| अक्र. | जिल्हा | शाळाबाह्य मुले जानेवारी २०१७ पर्यंत | अक्र. | जिल्हा | शाळाबाह्य मुले जानेवारी २०१७ पर्यंत | अ.क्र. | जिल्हा | शाळाबाह्य मुले जानेवारी २०१७ पर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अहमदनगर | ४०२ | १३. | जळगांव | २५२२ | २५. | पालघर | ३५५० |
| २. | अकोला | ३४३ | १४. | जालना | १७५८ | २६. | पुणे | ७०६१ |
| ३. | अमरावती | ११५ | १५. | कोल्हापूर | १२७ | २७. | रायगड | ७५२ |
| ४. | औरंगाबाद | १९९ | १६. | लातूर | १६९ | २८. | रत्नागिरी | ३२६ |
| ५. | बीड | ३५६८ | १७. | मुंबई शहर | १२६१ | २९. | सांगली | १८० |
| ६. | भंडारा | ८० | १८. | मुंबई उपनगर | ६०४८ | ३०. | सातारा | १९७ |
| ७. | बुलडाणा | १६२ | १९. | नागपूर | ३८५ | ३१ | सिंधुदुर्ग | ४१३ |
| ८. | चंद्रपूर | २२३ | २०. | नांदेड | १०४२ | ३२. | सोलापूर | ११७१ |
| ९. | धुळे | ११९० | २१. | नंदुरबार | १४०३ | ३३. | ठाणे | ६३६४ |
| १०. | गडचिरोली | १३२ | २२. | नाशिक | ३४२६ | ३४. | वर्धा | ९२ |
| ११. | गोंदिया | १४२ | २३. | उस्मानाबाद | २४५ | ३५. | वाशिम | १८१ |
| १२. | हिंगोली | ९०६ | २४. | परभणी | ३१९ | ३६. | यवतमाळ | ७२२ |
| | | | | | | | **एकूण** | **४७१७६** |

*-स्त्रोत: माहितीच्या अधिकाराखाली महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून प्राप्त माहिती*

- ☞ **जानेवारी २०१६ ते जानेवारी २०१७ पर्यंत राज्यभरात ४७ हजार १७६ शाळाबाह्य मुले आढळून आली आहेत.**
- ☞ **शाळाबाह्य मुलांची संख्या ठाणे जिल्ह्यात सर्वात जास्त ६ हजार ३६४ तर मुंबई उपनगरात ६ हजार ४८ इतके प्रचंड आहे. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात शाळाबाह्य मुले आढळून येणे ही धोक्याची घंटाच मानायला हवी.**

**महाराष्ट्र शिक्षण परिषदेकडून मिळालेल्या माहितीनुसार दिनांक ४ जुलै २०१५ ते ३१ जानेवारी २०१६ या कालावधीमध्ये ७४,९७१ मुले शाळाबाह्य आहेत. तर पुढे जानेवारी, २०१७ पर्यंत ४७ हजार १७६ शाळाबाह्य मुले सापडली या दोघांची बेरीज केली तर ही संख्या १,२२,१४७वर जाते. परंतु नुकतेच मान.शिक्षण सचिवांनी मान्य केल्यानुसार ही संख्या ४ लाखांपेक्षा अधिक असू शकते हे मान्य केले. यावरून आपल्याला या प्रश्नाची दाहकता समजू शकते.**

**शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण पुरे झाले आता कृती करा, आणि प्रत्यक्ष योजना कार्यान्वयीत करा.**

## केंद्र शासनाच्या माहितीप्रमाणे राज्यात शिक्षकांची ३२ हजार ९४४ पदे रिक्त
## वर्ष २०१५-१६

तक्ता क्र.५

| शाळा | मंजूर | | | भरलेली | | | रिक्त | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | राज्य | स.शि.अ. | एकूण | राज्य | स.शि.अ. | एकूण | राज्य | स.शि.अ. | एकूण |
| प्राथमिक | २०१२५३ | २७५७० | २२८८२३ | २०१२५३ | १४९४० | २१६१९३ | ० | १२६३० | १२६३० |
| मुख्याध्यापक | ७९५२ | ११८७८ | १९८३० | ७९५२ | ० | ७९५२ | ० | ११८७८ | ११८७८ |
| उच्च प्राथमिक | ७४२०४ | १३०९ | ७५५१३ | ६७९६४ | ४४७ | ६३४११ | ६२४० | ८६२ | ७१०२ |
| मुख्याध्यापक | ३२८७ | १३३४ | ४६२१ | ३२८७ | ० | ३२८७ | ० | १३३४ | १३३४ |
| एकूण | २८६६९६ | ४२०९१ | ३२८७८७ | २८०४५६ | १५३८७ | २९०८४३ | ६२४० | २६७०४ | ३२९४४ |

*स्त्रोत: मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार*

☞ **वर्ष २०१५-१६ पर्यंत राज्यातील प्राथमिक व उच्च प्राथमिक मंजूर शिक्षक व मुख्याध्यापकांची संख्या ३ लाख २८ हजार ७८६ होती. त्यापैकी २ लाख ९० हजार ८४३ पदे भरण्यात आली व ३२ हजार ९४६ शिक्षक व मुख्याध्यापकांची पदे रिक्त आहेत.**

☞ **प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षक व मुख्याध्यापकांची पदे पाहिली तर आजही अनुक्रमे १९ हजार ७३२ शिक्षक व १३ हजार २१२ मुख्याध्यापकांची पदे रिक्त आहेत.**

☞ **प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांतील शिक्षकांच्या पदे पाहिली तर असे लक्षात येते की, एकूण रिक्त पदांपैकी २४ हजार ५०८ पदे ही प्राथमिक शाळेतील आहेत एकूण रिक्त पदांमध्ये हे प्रमाण ७४.३९% आहे.**

☞ **मुख्याध्यापकांची एकूण १३ हजार ३१२ पदे रिक्त असून त्यापैकी प्राथमिक शाळांमधील ११ हजार ८७८ (८९.२२%) पदे रिक्त आहेत.**

## रिक्त पदांचा वाढला भार; प्रभारींचाच सर्वत्र कारभार

वसई तालुक्यात जिल्हा परिषदेच्या एकूण २१३ शाळा आहेत. त्यापैकी १९ शाळा मुख्याध्यापकांच्या प्रतिक्षेत असून वसई तालुक्यात मागील सहा वर्षात स्वतंत्र गट शिक्षण अधिकारी देण्यात आला नसून आतापर्यंत विस्तार अधिकाऱ्यांवर प्रभारी म्हणून गटशिक्षण अधिकाऱ्यांची जबाबदारी टाकून शिक्षणाचा गाडा रेटायचे काम चालले आहे. तसेच मागील सहा महिन्यांपासून पंचायत समितीचे गटविकास अधिकाऱ्याचे पदही रिक्त आहे. तो भार सहाय्यक गटविकास अधिकाऱ्यावर प्रभारी गटविकास अधिकारी म्हणून भार टाकण्यात आला आहे.

मुख्याध्यापकांची एकूण १३ हजार ३१२ पदं रिक्त असून त्यापैकी प्राथमिक शाळांमधील ११ हजार ८७८ (८९.२२%) पदे रिक्त आहेत. वसई तालुक्यातील १९ शाळांमध्ये मुख्याध्यापकांची नियुक्ती करीत नसल्यामुळे मुख्याध्यापकांशी संबंधित पाठसभा, मिटींग आणि इतर कामे शाळेतील वरिष्ठ शिक्षक पार पाडत आहेत. १२५ शिक्षकांची कमतरता असताना शिक्षकांवर कामाचा अतिरिक्त ताण येत आहे. शाळेचे शैक्षणिक धोरण ठरविण्यात मुख्याध्यापक हे पद महत्त्वाचे असताना सरकार मात्र भरती प्रक्रिया करण्यासाठी वेळकाढू धोरण अवलंबत आहे. सदर १९ शाळांमध्ये शिक्षणाचा दर्जा खालावत असल्याने मुलांची पटसंख्या कमालीची कमी झाली आहे. राज्यभर शिक्षक आणि शिक्षकतेर कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांची तीच स्थिती असल्यामुळे त्याचा एकूणच राज्याच्या शिक्षणावर अनिष्ट परिणाम झाला आहे.

# सर्व शिक्षा अभियान राबविणारी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद-मुंबई कार्यालयातच ६५ पदे रिक्त

## सर्व शिक्षा अभियान अंतर्गत भरण्यात आलेली पदे

तक्ता क्र.६

| अक्र. | पदनाम | मंजूर पदे | प्रतिनियुक्ती पदे | कंत्राटी पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | राज्य प्रल्कप संचालक | १ | ० | ० | ० | १ |
| २. | सह संचालक (प्रशासन) | १ | ० | ० | ० | १ |
| ३. | सह संचालक (गुणवत्ता) | १ | ० | ० | ० | १ |
| ४. | उप संचालक - प्रल्कप | १ | ० | ० | ० | १ |
| ५. | उप संचालक - विश्लेषक | १ | ० | ० | ० | १ |
| ६. | सह संचालक - (वित्त) | १ | १ | ० | १ | ० |
| ७. | कार्यकारी अभियंता - मुख्य अभियंता (नागरी) | १ | १ | ० | १ | ० |
| ८. | उप अभियंता | ६ | १ | २ | ३ | ३ |
| ९. | सहाय्यक संचालक (प्रशासन) | १ | ० | ० | ० | १ |
| १०. | सहाय्यक संचालक (वित्त) | १ | १ | ० | १ | ० |
| ११. | सहाय्यक संचालक (संशोधन) | १ | ० | ० | ० | १ |
| १२. | सहाय्यक संचालक (प्रसार) | १ | ० | ० | ० | १ |
| १३. | सहाय्यक संचालक (जिल्हा शिक्षण) | १ | ० | ० | ० | १ |
| १४. | सहाय्यक संचालक (प्रशिक्षण) | १ | ० | ० | ० | १ |
| १५. | सहाय्यक संचालक (प्रकल्प) | १ | ० | ० | ० | १ |
| १६. | समन्वयक | ३ | ० | २ | २ | १ |
| १७. | लेखापाल | २ | १ | ० | १ | १ |
| १८. | संगणक प्रोग्रॅमर | ५ | ० | २ | २ | ३ |
| १९. | खरेदी अधिकारी | १ | ० | ० | ० | १ |
| २०. | कार्यक्रम अधिकारी | ८ | ० | २ | २ | ६ |
| २१. | सहाय्यक कार्यक्रम अधिकारी | १४ | १० | ० | १० | ४ |
| २२. | कनिष्ठ अभियंता (मुख्य कार्यालय) | १५ | ० | ३ | ३ | १२ |
| २३. | स्ट्रक्चरल डिझायनर / संरचना नकाशाकार | १ | ० | ० | ० | १ |
| २४. | वास्तुशास्त्रज्ञ | १ | ० | ० | ० | १ |
| २५. | ड्राफ्टस्मन /प्रारुपकार (नागरी) | २ | ० | ० | ० | २ |
| २६. | सहाय्यक लेखापाल/ऑडिट ऑफिसर | ४ | ३ | ० | ३ | १ |
| २७. | कनिष्ठ लेखापाल | ३ | ३ | ० | ३ | ० |
| २८. | लघुलेखक (नि. श्रेणी) | ४ | ० | ४ | ४ | ० |
| २९. | लघुटंकलेखक | २ | ० | ० | ० | २ |
| ३०. | डेटा एन्ट्री ऑपरेटर | २४ | ० | १२ | १२ | १२ |
| ३१. | लिपिक- टंकलेखक | ९ | ० | ८ | ८ | १ |
| ३२. | वाहन चालक | ५ | ० | ३ | ३ | २ |
| ३३. | नाईक | १ | ० | १ | १ | ० |
| ३४. | शिपाई | ७ | ० | ६ | ६ | १ |
| ३५. | रक्षक | २ | ० | २ | २ | ० |
| | **एकूण** | **१३३** | **२१** | **४७** | **६८** | **६५** |

*स्त्रोत: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती*

☞ केंद्र शासन वर्ष २००१-२ पासून 'सर्व शिक्षा अभियान' सर्व राज्यात राबवित आहे. महाराष्ट्र राज्यात सर्व शिक्षा अभियानाची जबाबदारी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबईकडे असून केंद्र शासन व राज्य शासनाची समन्वय साधणे व राज्यातील सर्व जिल्ह्यात व सर्व महानगरपालिकांमध्ये निधीचे वितरण करणे व त्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम महाराष्ट्र शिक्षण परिषद करीत आहे.

☞ माहितीच्या अधिकाराअंतर्गत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबईकडे त्यांच्याकडील आस्थापने विषयी माहिती मागविली असता धक्कादायक माहिती समोर आली असून त्यांच्या मुंबई कार्यालयात १३३ पदे मंजूर असून त्यापैकी केवळ ६८ पदे भरली गेली आहेत तर ६५ (४८.८७%)पदे रिक्त आहेत.

☞ ६५ रिक्त पदांमध्ये सहसंचालकाचे राज्य प्रकल्प संचालक, सहसंचालक प्रशासन, सहसंचालक गुणवत्ता, उपसंचालक प्रकल्प व उपसंचालक विश्लेषक अशी महत्त्वाची प्रत्येकी १-१ पद रिक्त आहे.

# पालघर जिल्ह्यातील आश्रमशाळांमध्ये २६६ पदे रिक्त

तक्ता क्र.७ **पालघर जिल्ह्यांतर्गत आदिवासी विकास विभाग-आश्रम शाळा रिक्त पदे (शाळानिहाय)**

| अक्र. | पदाचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १. | कुल प्रमुख | ० | ० | ० |
| २. | माध्यमिक मुख्याध्यापक | २६ | १० | १६ |
| ३. | क. म. शिक्षक | २८ | २५ | ३ |
| ४. | प्राथमिक मुख्याध्यापक | १ | ० | १ |
| ५. | माध्यमिक शिक्षक | १०४ | ७३ | ३१ |
| ६. | प. प्राथमिक शिक्षक | ३० | १९ | ११ |
| ७. | प्राथमिक शिक्षक | २०९ | १३२ | ७७ |
| ८. | क्रीडा शिक्षक | ० | ० | ० |
| ९. | चित्रकला शिक्षक | ० | ० | ० |
| १०. | अधीक्षक | ३५ | १६ | १९ |
| ११. | स्त्री अधिक्षिका | ३५ | १४ | २१ |
| १२. | ग्रंथपाल | ५ | ४ | १ |
| १३. | प्रयोग शाळा सहाय्यक | ० | ० | ० |
| १४. | नर्स | ० | ० | ० |
| १५. | मुख्य लिपिक | ० | ० | ० |
| १६. | वरिष्ठ लिपिक | ० | ० | ० |
| १७. | कनिष्ठ लिपिक | २० | ११ | ९ |
| १८. | प्रयोगशाळा परिचर | २६ | १२ | १४ |
| १९. | शिपाई | २२ | १५ | ७ |
| २०. | स्वयंपाकी | १५७ | १२३ | ३४ |
| २१. | कामाठी | १२५ | १०९ | १६ |
| २२. | चौकीदार | २० | १६ | ४ |
| २३. | सफाई कामगार | ९ | ७ | २ |
| | **एकूण** | **८५२** | **५८६** | **२६६** |

*-माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती*

☞ पालघर जिल्ह्यात एकूण १०३ आश्रमशाळा आहेत त्यामध्ये शासकीय आश्रमशाळांची संख्या ६५ आहेत. तर अनुदानित आश्रमशाळांची संख्या ३८ आहे. या सर्वच आश्रमशाळा ग्रामीण भागात आहेत.

☞ आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या आश्रमशाळांमध्ये ८५२ पदे मंजूर आहेत तर त्यापैकी ५८६ पदे भरली गेली आहेत तर २६६ पदे रिक्त आहेत.

☞ रिक्त पदांमध्ये सर्वात अधिक रिक्त पदे २०९ पदांपैकी ७७ पदे रिक्त आहेत. तर २१ ठिकाणी स्त्री अधिक्षिका हे महत्त्वाचे पद रिक्त आहे. तर पुरुष अधिक्षकांची १९ पदे रिक्त आहेत.

☞ स्वयंपाकी या पदाच्या १५७ पदे मंजूर असून ३४ पदे रिक्त आहेत.

☞ माध्यमिक शिक्षकांची १०४ पदे मंजूर असून ३१ पदे रिक्त आहेत.

☞ क्रीडा शिक्षक / चित्रकला शिक्षक ही महत्त्वाची पदे असूनही आश्रमशाळांमध्ये ही मंजूरही नाहीत आणि भरलीही गेलेली नाहीत.

## पालघर जिल्ह्यातील वसतिगृहात १९ पदे रिक्त

तक्ता क्र. ८ **वसतिगृह गोषवारा**

| अक्र. | पदाचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १. | वरिष्ठ लिपिक | ८ | ६ | २ |
| २. | सांख्यिकी सहाय्यक | १ | ० | १ |
| ३. | लघुटंकलेखक | १ | १ | ० |
| ४. | कनिष्ठ लिपिक | २१ | ९ | १२ |
| ५. | वाहन चालक | २ | २ | ० |
| ६. | शिपाई | ५ | ३ | २ |
| ७. | चौकीदार | १ | ० | १ |
| ८. | अर्धवेळ सफाई कामगार | १ | ० | १ |
| | **एकूण** | ४० | २१ | १९ |

*-माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती*

☞ पालघर जिल्ह्यात आदिवासी विकास विभागाचे डहाणू आणि जव्हार अशी दोन प्रकल्प कार्यालये आहेत. या प्रकल्पांतर्गत अनुक्रमे १७ व १६ असे ३३ वसतिगृह आहेत. यात १३ मुलींची वसतिगृह आहेत. या दोन्ही प्रकल्पांच्या ३३ वसतिगृहात ४ हजार ८११ विद्यार्थी राहत आहेत.

☞ पालघर जिल्ह्यातील वसतिगृहांची माहितीच्या अधिकाराखाली मिळालेल्या माहितीनुसार ४० पदे मंजूर आहेत तर २१ पदे भरली गेलेली आहेत तर १९ पदे रिक्त आहेत. त्यामध्ये सर्वात अधिक कनिष्ठ लिपिकांची १२ पदे रिक्त आहेत.

# एक शिक्षकी शाळांचे ग्रहण सुटेना!

शिक्षण हक्क कायद्यानुसार एक शिक्षकी शाळा कालबाह्य ठरविल्या आहेत. ६० विद्यार्थ्यांपर्यंत २ शिक्षक असणे अनिवार्य केले आहे. १ एप्रिल २०१३ पासून या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. परंतु राज्यात आजही ३ हजार शाळा एक शिक्षकी असताना याचे समर्थन शिक्षण मंत्री कसे करणार? नवनिर्मित पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या अनेक शाळा आजही एकशिक्षकी आहेत. डहाणू तालुक्यातील ४७१ शाळांपैकी १३ शाळा एकशिक्षकी आहेत. या सर्व शाळा आदिवासी भागातील असून बहुसंख्य विद्यार्थी आदिवासी आहेत.त्यामुळे एका शिक्षकाला किमान ४ किंवा त्यापेक्षा अधिक वर्ग सांभाळावे लागतात. शैक्षणिक वातावरणाअभावी शैक्षणिक असमतोल, विद्यार्थी गळती. अध्ययन अध्यापन प्रक्रियेला खीळ बसत आहे.

आज संपूर्ण महाराष्ट्रात ९७ हजार ८४ प्राथमिक शाळांपैकी, ३ हजार ९ शाळा या एक शिक्षकी आहेत. असे 'डायस' चा २०१४-१५ चा अहवाल सांगतो. पालघर जिल्ह्यापेक्षा महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांची स्थिती आज वेगळी नाही. संयुक्त राष्ट्र संघाच्या जाहीरनाम्यानुसार बालकांच्या दहा हक्कांपैकी सातवा हक्क शिक्षणाचा आहे. भारतीय संविधानाने कलम २१ (क) प्रमाणे सहा ते १४ वर्षांच्या बालकांना मोफत तसेच सक्तीच्या शिक्षणाचा हक्क बहाल केला आहे. मात्र वरील स्थिती पाहता शिक्षणाचा दर्जा सुधारत असल्याचा राज्य शासनाचा दावा फोल ठरला आहे. याबाबत हे शासन कोणती उपाययोजना करणार आहे.

## राज्यात ३ हजार ३१५ एक शिक्षकी शाळा

तक्ता क्र. ९

| अक्र. | जिल्हा | शाळांची संख्या | अक्र. | जिल्हा | शाळांची संख्या | अक्र. | जिल्हा | शाळांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अहमदनगर | १३२ | १३. | जळगांव | १३० | २५. | पालघर | १५७ |
| २. | अकोला | २० | १४. | जालना | ६४ | २६. | पुणे | ३६७ |
| ३. | अमरावती | ३२ | १५. | कोल्हापूर | ५३ | २७. | रायगड | १६७ |
| ४. | औरंगाबाद | ८४ | १६. | लातूर | ७० | २८. | रत्नागिरी | २१९ |
| ५. | बीड | ३१ | १७. | मुंबई जिल्हा | २ | २९. | सांगली | १३७ |
| ६. | भंडारा | २३ | १८. | मुंबई उपनगर | ४७ | ३०. | सातारा | ५७ |
| ७. | बुलडाणा | ३३ | १९. | नागपूर | ३८ | ३१. | सिंधुदुर्ग | ७९ |
| ८. | चंद्रपूर | ५७ | २०. | नांदेड | ४५ | ३२. | सोलापूर | १५९ |
| ९. | धुळे | ४८ | २१. | नंदुरबार | ८३ | ३३. | ठाणे | २३६ |
| १०. | गडचिरोली | ९३ | २२. | नाशिक | २९५ | ३४. | वर्धा | ४० |
| ११. | गोंदिया | ३२ | २३. | उस्मानाबाद | १२० | ३५. | वाशिम | २५ |
| १२. | हिंगोली | २६ | २४. | परभणी | ५३ | ३६. | यवतमाळ | ६१ |
| | | | | | | | **एकूण** | **३३१५** |

*स्रोत: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती*

☞ **राज्यभरात ३ हजार ३१५ एकशिक्षकी शाळा असून सर्वात अधिक एक शिक्षकी शाळा पुण्यात असून त्यांची संख्या ३६७ आहे. तर नाशिक मध्ये २९५ तर ठाणे जिल्ह्यात २३६ एवढ्या एकशिक्षकी शाळा आहेत.**

# सर्व शिक्षा अभियानांचा ६१३ कोटींचा निधी अखर्चित

## सर्व  शिक्षा अभियानासाठी केंद्र शासनाकडून येणारा निधी खर्चच होत नाही.

तक्ता क्र.  १०  *(रु. लाखात)*

| अक्र. | जिल्हा | मंजूर निधी २०१६-१७ | जिल्ह्याला मिळालेला एकूण निधी | झालेला खर्च (जाने-२०१७) | मंजूर निधी पैकी खर्चाची % | मिळालेल्या निधीपैकी झालेला खर्चाची % |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अहमदनगर | १४४०८.५२ | ११९०८.८० | ८८५९.८१ | ६१.४९ | ७९.७५ |
| २. | अकोला | २५५७.०५ | १७२८.४६ | १०४२.३८ | ४०.७७ | ६०.३१ |
| ३. | अमरावती | ४१०१.८७ | २६९६.६८ | २५५२.२७ | ६२.२२ | ९४.६५ |
| ४. | औरंगाबाद | १२३३८.१४ | ९३९८.६१ | ८६२९.८० | ६९.९४ | ९१.८२ |
| ५. | बीड | १२४६५.९६ | ५९०५.६५ | ५२९३.०९ | ४२.४६ | ८९.६३ |
| ६. | भंडारा | २३१८.९३ | १६१८.१० | १४४१.०५ | ६२.१४ | ८९.०६ |
| ७. | बुलडाणा | ४९३०.५४ | ३३४७.७६ | ३०३६.९३ | ६१.५९ | ९०.७२ |
| ८. | चंद्रपूर | ३३२५.१७ | २०२२.७३ | १२९१.८१ | ३८.८५ | ६३.८६ |
| ९. | धुळे | ३८५८.५९ | २७४६.३३ | २३४०.०१ | ६०.६४ | ८५.२० |
| १०. | गडचिरोली | ५७१०.३८ | ४४९६.६८ | ४०६७.१५ | ७१.२२ | ९०.४५ |
| ११. | गोंदिया | ४८०९.९६ | ३६९४.४० | ३५४०.९२ | ७३.६२ | ९५.८५ |
| १२. | हिंगोली | ३९१८.३८ | २४३२.३८ | १५९२.२१ | ४०.६३ | ६५.४६ |
| १३. | जळगांव | ६२६७.७८ | ४३७५.६१ | ३४६०.२२ | ५५.२१ | ७९.०८ |
| १४. | जालना | ७९५८.०६ | ५५५५.८२ | ५१६६.६५ | ६४.९२ | ९३.०० |
| १५. | कोल्हापूर | ५१३२.४२ | ३६४६.९८ | ३३३२.४३ | ६४.९३ | ९१.३७ |
| १६. | लातूर | ४२४९.१९ | २८१७.९४ | २५७९.६६ | ६०.७१ | ९१.५४ |
| १७. | नागपूर | ४०७३.०९ | २९१४.८४ | २३६३.९१ | ५८.०४ | ८१.१० |
| १८. | नांदेड | ९४८०.५० | ६३३८.८६ | ६१४८.४२ | ६४.८५ | ९७.०० |
| १९. | नंदुरबार | ५५७२.४५ | ४२३८.३६ | ३४५८.७७ | ६२.०७ | ८१.६१ |
| २०. | नाशिक | १५२३८.१४ | १०५७४.४४ | १००२०.९० | ६५.७६ | ९४.७७ |
| २१. | उस्मानाबाद | ३४२२.०९ | २४१४.८४ | १८७७.८८ | ५४.८८ | ७७.७६ |
| २२. | पालघर | १००६७.९१ | ७३८४.०१ | ५९६५.४७ | ५९.२५ | ८०.७९ |
| २३. | परभणी | ५०८२.५२ | ३७३२.२४ | २५८२.२७ | ५०.८१ | ६९.१९ |
| २४. | पुणे | ९०१४.९९ | ६१६२.१७ | ५७२२.०१ | ६३.४७ | ९२.८६ |
| २५. | रायगड | ७६१७.६९ | ५२०८.७९ | ४८१७.२२ | ६३.२४ | ९२.४८ |
| २६. | रत्नागिरी | ३१३१.६४ | २४४९.४१ | १७९५.४३ | ५७.३३ | ७३.३० |
| २७. | सांगली | ४३१२.५५ | ३०१३.१५ | २७१५.५० | ६२.९७ | ९०.१२ |
| २८. | सातारा | ६५२५.०५ | ४६४३.२३ | ४३७७.९८ | ६७.१० | ९४.२९ |
| २९. | सिंधुदुर्ग | १६९५.२५ | ११५२.८४ | ९९१.७२ | ५८.५० | ८६.०२ |
| ३०. | सोलापूर | १०७०२.८७ | ८०४४.५६ | ७३९८.१६ | ६९.१२ | ९१.९६ |
| ३१. | ठाणे | ४६६०.४९ | ३५९५.२२ | २८२५.६३ | ६०.६३ | ७८.५९ |
| ३२. | वर्धा | १८०८.४८ | १२०२.४९ | ९९८.८३ | ५५.२३ | ७०.५६ |
| ३३. | वाशिम | १७२६.७६ | १२२७.६४ | ८६६.१६ | ५०.१६ | ९१.५२ |
| ३४. | यवतमाळ | ८५५४.७२ | ५७८१.९० | ५२९१.४८ | ६१.८५ | ६१.०६ |
| | राज्य कार्यालय | ४३०१.४८ | ४१८१२.२७ | २५५२८.८५ | | |
| | **एकूण** | **२१५३३९.६०** | **१८९४८४.२०** | **१५३९७२.९९** | **७१.५०** | **८१.०२६** |

*-स्त्रोत: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती*

☞ **वर्ष २०१६-१७ साठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत राज्यातील सर्व जिल्ह्यांना २ हजार १५३ कोटी ३९ लाख रुपायांचा निधी मंजूर झाला होता त्यापैकी १ हजार ८९४ कोटी ८४ लाखांचा निधी सर्व जिल्ह्यांना प्राप्त झाला मात्र त्यापैकी केवळ १ हजार ५३९ कोटी ७२ लाखांचा निधी खर्च झाल्याची माहिती माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त झाली आहे. निधी खर्च होण्याचे प्रमाण ७१.५०% असून २८.५०% निधी खर्च करण्यात राज्यातील जिल्ह्यांना अपयश आले आहे.**

# महानगरपालिकांनी सर्व शिक्षा अभियानांचा ९६ कोटींचा निधी अखर्चित ठेवला

## राज्यातील महानगरपालिकांसाठी सर्व शिक्षा अभियानासाठी येणारा निधी खर्चच होत नाही.

तक्ता क्र. ११ *(रु. लाखात)*

| अक्र. | महानगरपालिका | मंजूर निधी २०१६-१७ | मिळालेला एकूण निधी | झालेला एकूण खर्च | मंजूर निधी पैकी झालेल्या खर्चाची % | मिळालेल्या निधीपैकी झालेला खर्चाची % |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अहमदनगर | ३०१.९९ | १६६.१३ | १२२.७४ | ४०.६५ | ७३.८८ |
| २. | अकोला | १३६.२९ | ८६.०४ | ७०.२३ | ५१.५३ | ८१.६२ |
| ३. | अमरावती | ३५६.३० | २११.९९ | १४९.८७ | ४२.०३ | ७०.७० |
| ४. | औरंगाबाद | ६८२.८० | २८६.१४ | २२८.९३ | ३३.५३ | ८०.०० |
| ५. | भिवंडी | ४९९.८५ | ३३०.७६ | २३२.८४ | ४६.५८ | ७०.४० |
| ६. | धुळे | २४३.१८ | १३४.९२ | ५८.९३ | २४.२३ | ४३.६८ |
| ७. | जळगांव | २५३.९४ | २०५.०५ | ६५.९४ | २५.९७ | ३२.१६ |
| ८. | कल्याण -डोंबिवली | ३९०.१२ | १७०.६४ | १२०.१९ | ३०.८१ | ७०.४४ |
| ९. | कोल्हापूर | २९८.७९ | २५०.७३ | ११५.९२ | ३८.८० | ४६.२३ |
| १०. | मालेगांव | ३६६.२९ | १७४.४४ | १११.५४ | ३०.४५ | ६३.९४ |
| ११. | मीरा- भाईंदर | १८१.३७ | १४०.२९ | ३६.६४ | २०.२० | २६.१२ |
| १२. | मुंबई | १७०९.७१ | ७६४.१७ | ३७९.५५ | २२.२० | ४९.६७ |
| १३. | मुंबई उपनगर | २७७१.७३ | ११७९.२२ | ११६९.१८ | ४२.१८ | ९९.१५ |
| १४. | नागपूर | ९७५.७८ | ३७१.९९ | १७९.३५ | १८.३८ | ४८.२१ |
| १५. | नांदेड-वाघाला | ३६६.५० | ३७३.२४ | ८८.९४ | २४.२७ | २३.८३ |
| १६. | नाशिक | ७३२.२२ | ३८१.२५ | २९०.६३ | ३९.६९ | ७६.२३ |
| १७. | नवी मुंबई | ३८४.०५ | ४४१.९९ | १४३.४६ | ३७.३५ | ३२.४६ |
| १८. | पिंपरी- चिंचवड | ७२५.१५ | ४११.४९ | २३८.८८ | ३२.९४ | ५८.०५ |
| १९. | पुणे | १३९०.८४ | ९८३.२३ | ३९६.७५ | २८.५३ | ४०.३५ |
| २०. | सांगली-मिरज | २६९.३६ | २१०.८९ | ४४.०२ | १६.३४ | २०.८७ |
| २१. | सोलापूर | ४५४.१६ | ३८८.९९ | १४८.८८ | ३२.७८ | ३८.२७ |
| २२. | ठाणे | ५७१.०५ | २९३.२१ | १८९.८३ | ३३.२४ | ६४.७४ |
| २३. | उल्हासनगर | २३२.५८ | १२५.६९ | ९४.४४ | ४०.६१ | ७५.१४ |
| **एकूण** | | **१४२९३.७३** | **८०८२.४९** | **४६७७.६९** | **३२.७३** | **५७.८७** |

*स्त्रोत: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती*

☞ **राज्यातील महानगरपालिकांसाठी सर्व शिक्षा अभियानासाठी येणारा निधी खर्चच होत नसल्याचे दिसून आले आहे वर्ष २०१६-१७साठी राज्यातील २३ महानगरपालिकांना केंद्राकडून १४२ कोटी ९३ लाखांचा निधी देण्यात आला होता त्यापैकी या महानगरपालिकांनी ४६ कोटी ७७ लाखांचा निधी खर्च केला असून उर्वरित ९६.१६ कोटींचा निधी अखर्चित आहे.**

# केळकर समितीने अभ्यासलेली
# राज्यातील शिक्षणाची स्थिती व सुचविलेल्या शिफारशी

- ☞ **शिक्षणाच्या हक्कामध्ये व राज्य सरकारच्या भौतिक पायाभूत सोयी सुविधांसाठी विहित केलेली मानके व प्रमाणके साध्य केली पाहिजेत, टिकवून ठेवली पाहिजेत आणि या संदर्भात काहीही खपवून घेता कामा नये.**
- ☞ **तसेच यासाठी पुरेशी वित्तीय तरतूद केली पाहिजे शिक्षणासाठी रक्कम कमी पडू देता कामा नये.**
- ☞ शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी अध्यापनशास्त्रात शिक्षकांचे पुनर्प्रशिक्षण करण्याची गरज आहे.
- ☞ **राज्यात विविध भागांतील लौकिक असलेल्या संस्थांना, मागासलेल्या क्षेत्रांमध्ये व अधिक विशेष म्हणजे आदिवासी क्षेत्रामध्ये त्यांची शैक्षणिक प्रांगणे (कॅंपस) उभारण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे.**
- ☞ **शिक्षणामध्ये माध्यमस्तर व तांत्रिक स्तरावरील शिक्षणाचा समावेश केला गेला पाहिजे.**
- ☞ प्राथमिक शिक्षणाच्या इयत्ता ४थी नंतरच्या व इयत्ता ५वी नंतरच्या स्तरांवर सरकारी परीक्षा सुरू करण्यात याव्यात. ही परीक्षा गंभीरपणे घेण्यात यावी आणि प्राथमिक स्तरावर देण्यात येत असलेल्या शिक्षणाच्या दर्जाचे मोजमाप म्हणून या परीक्षांच्या निकालांचा वापर करण्यात यावा.
- ☞ मराठवाड्यामध्ये मुलींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे आणि म्हणून महिलांसाठी वसतिगृहे व अन्य पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अतिरिक्त वित्तीय तरतूद करण्यात यावी.
- ☞ **राज्याच्या काही भागात असलेला निरक्षरतेचा उच्च स्तर, हा अजूनही ''शाळाबाह्य'' मुलांना परिणामकारकपणे शिक्षणव्यवस्थेत सामावून घेण्यात न आल्यामुळे आहे त्यात सुधारणा करण्याबाबत शासनाने अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.**
- ☞ **जरी साक्षरता दर ८२ टक्के असला तरी निरक्षरांची एकूण संख्या देखील खूपच जास्त आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यात हे अपेक्षित नाही. साधन संपत्तीचा सुयोग्य वापर आणि विद्यमान धोरणांची परिणामकारक अंमलबजावणी या माध्यमातून ही परिस्थिती सुधारण्याची आवश्यकता आहे.**
- ☞ महिलांमधील निरक्षरता ही अधिक असून, त्यावर लक्ष केंद्रीत करण्याची आणि खास करून नंदूरबारसारख्या भागामध्ये कडक मोहीम राबवून याकडे गंभीरपणे लक्ष देण्याची गरज आहे.
- ☞ २०११ च्या जनगणनेत प्रत्येक जिल्ह्याच्या तालुक्यांमधील साक्षरता दराची माहिती दिली आहे. यावरून लक्षात येणारी बाब म्हणजे साक्षरता दर निर्देशांकानुसार जिल्हा जरी प्रगत असला तरी त्यात अनेक तालुके अप्रगत दिसून येतात. **उदा. ठाणे जिल्ह्याचा साक्षरता दर २०११ च्या जनगणनेनुसार ८६.२ टक्के आहे. तर तलासरी तालुक्यात ५८.९%, विक्रमगड ५७.८%, जव्हार ५८.६%, आणि मोखाडा तालुक्यात ५८.४% इतका साक्षरता दर नोंदविण्यात आला आहे. या जिल्ह्यांमधील महिला साक्षरता दर त्याहीपेक्षा कमी म्हणजे ४६ ते ५१ टक्के इतका आहे. हे मुख्य आदिवासी जिल्हे आहेत. आणि या जिल्ह्यांकरिता विशेष उपायोजना करणे आवश्यक आहे.**
- ☞ **ठाणे जिल्ह्यात रोजगारासाठी स्थलांतर करणाऱ्यांचे प्रमाण सर्वात जास्त असल्याने स्थलांतरित मुलांचे प्रमाणही या जिल्ह्यात सर्वात अधिक आहे.**